श्री.आनंदा दादाभाऊ औटी, तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक (लिपीक), ए.बा.वि.से.प्रकल्प पारनेर यांनी कार्यालयीन कामी गैरवर्तन केलेने विभागीय चौकशी सुरु करणेकामी सादरकर्ता व चौकशी अधिका-याची नेमणुक करणेबाबत.

अहिल्यानगर जिल्हा परिषद

सामान्य प्रशासन विभाग

जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि/आस्था-३/१७५६९७६/१०६४/२०२५

अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

वाचा:- १. इकडील निलंबन आदेश साप्रवि-१/आस्था-३/३५९/२०२५ दिनांक ०९/०५/२०२५

२. इकडील दोषारोप पत्र जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/३५८/२०२५ दि ०९/०५/२०२५

३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा यांचेकडील पत्र वशि/आस्था-१/८७/२०२५ दि १५/०९/२०२५ समवेत श्री औटी यांचा खुलासा दि ०२/०६/२०२५

४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील ६ (५)

श्री. आनंदा दादाभाऊ औटी, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) हे ए.बा.वि.से. प्रकल्प पारनेर येथे कार्यरत असताना कार्यालयीन कामी कामकाजात हलगर्जीपणा व कार्यालयीन शिस्तीचे उल्लंघन करुन कार्यालयीन कामकाजात गैरवर्तन केल्याने संदर्भ क्र. १ अन्वये श्री. औटी यांना सेवानिलंबीत करणेत आलेले होते. संदर्भ क्र.२ नुसार श्री औटी यांना ज्ञापन दोषारोप बजाविण्यात आले. सदर ज्ञापन दोषारोप पत्रामध्ये त्यांचेवर ठेवण्यात आलेले आरोप संदर्भ क्र. ३ अन्वये श्री.औटी यांनी त्यांचेकडील दिनांक ०२/०६/२०२५ रोजीचे खुलाशानुसार अमान्य केल्याने श्री.औटी, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) यांचेविरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने विभागीय चौकशी करणे क्रमप्राप्त असल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील (६) च्या तरतुदीनुसार खातेनिहाय चौकशी करणेचे निश्चित करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी, तथा सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि.प.कर्मचारी), आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करीत आहे. तसेच विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागु राहतील.

तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ६ (५) अन्वये जिल्हा परिषदेची बाजु मांडणेकरिता सादरकर्ता अधिकारी म्हणुन श्री.महेश सकाहरी साळुंके, सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती पारनेर यांची नेमणुक करण्यात येत आहे. सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे. त्याप्रमाणे संदर्भ क्रं.२ मध्ये नमुद केलेले आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची बाजु मांडावी.

..२

परिशिष्ट क्रमांक तीन व चार मध्ये (दोषारोपपत्र) नमुद केलेले साक्षीदार यांना पुराव्याच्या कागदपत्रांसह चौकशीच्या दिवशी हजर ठेवावे. तसेच सोबत प्राथमिक कार्याचा करावयाचा तपशिल जोडला आहे. उक्त नमुद कामी हयगय झाल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक 202510020401.71 असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 02-10-2025 14:10:27
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. विभागीय चौकशी अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि.प.कर्मचारी), नाशिक विभाग, नाशिक. **सोबत संबंधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र १ ते**

२. श्री.महेश सकाहरी साळुंके, सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती पारनेर
**व्दारा व प्रत**- गट विकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर
२/-सदर आदेशाची प्रत श्री.महेश सकाहरी साळुंके, सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती पारनेर, यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.
**सोबत संबंधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र पान क्र.१ ते**

३. श्री. आनंदा दादाभाऊ औटी, कनिष्ठ सहाय्यक (लि) जि.प.लपा उपविभाग श्रीगोंदा
व्दारा:- उपविभागीय जलसंधारण अधिकारी जि.प.लपा उपविभाग श्रीगोंदा
२/-सदर आदेशाची प्रत श्री. आनंदा दादाभाऊ औटी, कनिष्ठ सहाय्यक यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.

स्वाक्षरी/--
(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर